लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाची थेट कर्ज योजना >>पान 2

लोकाभिमुख प्रशासन निर्माण करणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी : अभिजीत राऊत >>पान 3

यंदा लोणार पर्यटन महोत्सव होणार >>पान 4

**सुविचार**


सातत्यपूर्ण मेहनत हेच खऱ्या यशाचे रहस्य आहे.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



विकी कौशलच्या अंगात भिनला मराठी बाणा! पथकासोबत केलं ढोल वादन

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 181 ■ मंगळवार, दि. 11 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# योग्य नियोजनासह सकारात्मकतेने परीक्षांना सामोरे जा

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : जीवनात स्वतःशी स्पर्धा ठेवून प्रत्येक क्षण सकारात्मकतेने जगा. आत्मविश्वास वाढण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करा, उद्दिष्टांचे लहान लहान टप्पे करुन ते पूर्ण केल्याचा क्षण साजरा करा. तसेच परीक्षांचा ताण न घेता अभ्यासावर लक्ष केंद्रित करा, त्यातून नक्की यश मिळेल, असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिला.**









दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी नवी दिल्ली येथे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या मुंबईत शिवाजी पार्क येथील स्काऊट आणि गाईडच्या सभागृहात झालेल्या प्रसारण कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्यासह विविध शाळांमधील विद्यार्थी उपस्थित होते.

प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा हेच अंतिम ध्येय न ठेवता सर्वांगीण ज्ञान मिळविण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा. स्वतःला ओळखून वर्तमानातील प्रत्येक क्षण उत्तम पद्धतीने जगावा. लिहिण्याच्या सवयीतून आपले मत व्यक्त होत असते.

अपयश हे जीवनात यशस्वी होण्यासाठीचे इंधन असते, असे सांगून प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी विद्यार्थ्यांना अपयशाची भीती न बाळगता त्याला आपला गुरू बनविण्याचा सल्ला दिला. एकाग्रतेसाठी ध्यान धारणेला महत्त्व असल्याचे सांगून निसर्ग, संतूलित आहार, नवनवीन तंत्रज्ञान, नेतृत्व करताना टीम वर्क आदी बाबींचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी निसर्गाची काळजी घेण्याचे आवाहन करून त्यांनी विद्यार्थ्यांना 'एक पेड मा के नाम' अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. पालकांनी विद्यार्थ्यांमधील क्षमता, त्यांच्या इच्छा ओळखावी आणि त्यांना प्रोत्साहन देऊन मदत करावी, असे आवाहन त्यांनी पालकांना केले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एसएनडीटी महाविद्यालयाच्या डॉ.अदिती सावंत यांच्या कॉटन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

### यशासाठी मनातील भीतीवर विजय मिळवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आव्हाने ही सर्वांसमोर असतात. सकारात्मकतेने त्यावर मात करावी, विद्यार्थ्यांनी इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करावी आणि मनातील भीतीवर विजय मिळवावा. सरावाने सामान्य माणूस देखील असामान्य काम करून असामान्य बनू शकतो, यामुळे प्रधानमंत्री यांनी दिलेल्या सल्लयानुसार स्वतःला ओळखून स्वतःमधील क्षमता वाढविण्याचा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, केवळ परीक्षा हेच अंतिम उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांनी जीवनातील आव्हानांशी कसा सामना करावा यादृष्टीने प्रधानमंत्र्यांशी झालेला संवाद हा अतिशय उपयुक्त आहे. प्रधानमंत्री अतिशय संघर्षमय जीवनातून यशस्वी झाले असून त्यांनी जगात भारताची नवी ओळख तयार केली आहे. या अनुभवातून विद्यार्थ्यांना जीवनाचे ज्ञान मिळावे, हा या कार्यक्रमाचा हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.


## ग्लोबल मीटर मॅन्यु कं.ची मीटर विक्री तात्काळ थांबविण्याचे न्यायालयाचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मे. ग्लोबल मीटर मॅन्युफॅक्चरींग कंपनीच्या उत्पादीत ऑटोरिक्षा/टॅक्सी मीटर ची विक्री व वितरण तात्काळ थांबविण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. पुण्याच्या या कंपनीद्वारे केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नमुन्यामध्ये (मॉडेल अप्रुव्हल) ग्राहकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने फेरबदल करण्यात आल्यासंदर्भातील याचिका न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

मे. ग्लोबल मीटर मॅन्युफॅक्चरींग कंपनी, पुणे यांनी त्यांनी Model Approval No.-IND/09/06/163 अन्वये उत्पादित केलेल्या मीटरची खरेदी करु नये तसेच वाहनावर हे मीटर न बसविण्याचे आवाहन नियंत्रण, वैद्यमापनशास्त्र यांनी केले आहे.

## बारावीच्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडून शुभेच्छा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा उद्या दिनांक ११ फेब्रुवारी पासून सुरू होत आहेत.

यानिमित्त शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मंत्री श्री. भुसे म्हणतात, प्रिय विद्यार्थी बंधू आणि भगिनींनो, आपल्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता बारावीची परीक्षा. ११ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या या उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी राज्यभरातील १५,०५,०३७ विद्यार्थी ३,३७३ केंद्रांवर परीक्षेला सामोरे जाणार आहेत.

आपले कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या कसोटीचा हा क्षण आहे. आत्मविश्र्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवून शांत मनाने, नीट तयारी करून आत्मविश्र्वासाने परीक्षा द्या. परीक्षा म्हणजे केवळ गुण मिळवण्याची स्पर्धा नाही, तर आपली ज्ञानपातळी तपासण्याची संधी आहे. शासन, प्रशासन, पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाज तुमच्या पाठीशी आहे. त्यामुळे कोणताही तणाव न घेता, सर्वतोपरी प्रयत्न करून उत्तम कामगिरी करा. तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## राज्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट व गतिमान करावी - सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी :** आरोग्य विभागांतर्गत राज्यातील नवीन शासकीय रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच शासकीय रुग्णालयांच्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करावीत, आरोग्य सेवा अधिक बळकट व गतिमान करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिले.

पायाभूत विकास कक्ष प्रगतीपथावरील कामकाज आढावा बैठकीत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर बोलत होत्या. यावेळी आरोग्य विभागाचे अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, संचालक नितीन अंबाडेकर उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, पायाभूत विकासाच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात याव्यात. ग्रामीण भागातील वैद्यकीय सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात यावा. यावेळी त्यांनी प्रगतीपथावर असलेली कामे व नवीन कामांचा, १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात येणाऱ्या कामांचा, आयुष रुग्णालय, प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम आदी बाबींचा आढावा घेतला.

# आजपासून बारावी बोर्डाची परीक्षा

### १५ लाखांहून अधिक विद्यार्थी देणार परीक्षा, कॉपीमुक्तीसाठी राज्यभरात २७१ भरारी पथकांची नियुक्ती



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जानेवारी महिना संपताच विद्यार्थ्यांना ओढ लागलेली असते ती १२ वीच्या परीक्षेची विद्यार्थ्यांकडून १२ वीच्या परीक्षेची तयारी देखील जोमाने सुरू असते, आता उद्यापासून बारावीची परीक्षा सुरू होत असून ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०१५ कालावधीत होणार बारावीची परीक्षा होत आहे. यंदाच्या वर्षी परीक्षेत एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले, तर ६ लाख ९४ हजार ६५२ मुली आहेत. यंदा ३७ तृतीयपंथी नागरिकही परीक्षेसाठी बसले आहेत. राज्यात एकूण १० हजार ५५० कनिष्ठ महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

विज्ञान शाखेला ६८ हजार ९६७ विद्यार्थी, कला शाखेला तीन लाख ८० हजार ४१० विद्यार्थी, वाणिज्य शाखेला तीन लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी तर किमान कौशल्य आधारित अभ्यासक्रम ३१ हजार ७३५ विद्यार्थी आहेत. टेक्निकल सायन्स ४ हजार ४८६ असे एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी यंदा परीक्षा देणार आहेत. पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागीय मंडळात ही परीक्षा होणार आहे. महाराष्ट्राचे माध्यमिक उच्च माध्यमिक नव विभागीय मंडळात ही परीक्षा होणार असून नव विभागीय मंडळात नियंत्रण कक्ष कार्यरत करून हेल्पलाइन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारी–मार्च २०२५ परीक्षेमध्ये वेळेनंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देण्यात आलेला आहे. दहावी बारावीच्या परीक्षांमध्ये ज्या परीक्षा केंद्रावर गैरमार्गाचे प्रकरणी आढळून येतील त्या केंद्राची परीक्षा केंद्र मान्यता पुढील वर्षापासून कायमची रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, असेही सांगण्यात येत आहे. कॉपीमुक्त परीक्षा घेण्यासाठी मंडळांनी अर्ध शासकीय पत्राद्वारे आव्हान केलेले आहेत.

राज्यात २७१ भरारी पथके

परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा या दृष्टीने मंडळामार्फत संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथके नेमण्यात आले आहेत. याशिवाय दक्षता समिती कार्यरत असून विभागीय मंडळात विशेष भरारी पदके स्थापन करण्यात आले आहेत. मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी, वैद्यकीय कारणास्तव प्रत्यक्ष तोंडी परीक्षा प्रकल्प व इतर परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेनंतर १२,१५,१७ मार्च रोजी आऊट ऑफ टर्न आयोजित करण्यात आलेले आहे. राज्यात मागील ९ परीक्षा विभागीय मंडळात एकूण ३ हजार ३७६ केंद्र आहेत, त्यातील ८१८ केंद्रावरील केंद्र संचालक बदलले गेले आहेत.

शिक्षणमंत्र्यांकडून विद्यार्थ्यांना शुभेच्छा

आपल्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता बारावीची परीक्षा. ११ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या या उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी राज्यभरातील १५,०५,०३७ विद्यार्थी ३,३७३ केंद्रांवर परीक्षेला सामोरे जाणार आहेत. शासन, प्रशासन,पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाज तुमच्या पाठीशी आहे. त्यामुळे कोणताही तणाव न घेता, सर्वतोपरी प्रयत्न करून उत्तम कामगिरी करा, अशा शब्दात शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### सोयाबीन खरेदीसाठी केंद्र सरकारकडून

# २४ दिवसांची मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारनं सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. सोयाबीन खरेदीसाठी केंद्र सरकारनं २४ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे किसान सभेकडून स्वागत करण्यात आलं आहे. राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी बाकी होती. आता या निर्णयामुळं मोठ्या प्रमाणात पुन्हा हमीभावानं सोयाबीनची खरेदी केली जाणार आहे. किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक ठिकाणची खरेदी केंद्र सुरु नाहीत. जी केंद्र सुरु आहेत तिथे पॅकिंगसाठी पुरेसा बारदान उपलब्ध करुन द्यावा. सरकारने त्यासाठी पावले टाकावीत अशी मागणी डॉ. अजित नवले यांनी केली आहे. निधी उपलब्ध करुन द्यावा आणि अधिक मात्रेने सोयाबीनची खरेदी करावी, मागणीनुसार सरकारी सोयाबीन केंद्र वाढवावे अशी मागणी देखील अजित नवलेंनी केली आहे.

सोयाबीन खरेदी बंद केल्याने अनेक शेतकरी वंचित आहेत. लाखो शेतकऱ्यांचे सोयाबीन पडून आहे. खरेदी केंद्राबाहेर अजूनही शेतकऱ्यांच्या रांगा आहेत. सोयाबीन खरेदी बंद झाल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळं सरकारने खरेदी केंद्राची मुदत वाढवून पुन्हा सोयाबीन खरेदी सुरु करावी अशी मागणी अजित नवलेंनी केली होती. अन्यथा किसान सभा राज्यभर आंदोलन छेडणार असून, कृषीमंत्र्यांच्या घरावर सोयाबीन ओतणार असल्याचा इशारा डॉ. अजित नवले यांनी सरकारला दिला. संपूर्ण राज्यामध्ये सोयाबीन खरेदी मोठ्या प्रमाणावर होत असताना या सोयाबीन खरेदीची मुदत संपली होती. त्यानंतर राज्यातील बहुतेक जिल्ह्यात सोयाबीन खरेदीला मुदत वाढ मिळण्याची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला होता. अखेर केंद्र सरकारनं आणखी २४ दिवस सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिली आहे.

अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी होणे बाकी आहे. राज्याचे सोयाबीनचे उत्पादन हे ६० ते ६५ लाख मेट्रीक टन आहे. त्यातील सरकार १३ लाख मेट्रीक टन सोयाबीन खरेदी करणार आहे. त्यातील सरकारने फक्त ७ ते ८ लाख मेट्रीक टन सोयाबीन खरेदी केलं आहे. राहिलेलं सोयाबीन आम्ही कुठं फेकायचं? असा सवाल तुपकर यांनी केला आहे. ही योजना शेतकऱ्यांसाठी आहे की व्यापाऱ्यांसाठी आहे? असा सवालही त्यांनी केला. ज्या संस्थाची अवकात नाही, त्या संस्थाना सोयाबीन खरेदी करण्याचे अधिकार दिले असल्याचे तुपकर म्हणाले. सोयाबीन खरेदी करणाऱ्या संस्थांनी प्रचंड मोठा घोळ घातल्याचा आरोप रविकांत तुपकर यांनी केला आहे.

# लोणार सरोवराच्या विकासकामांना गती द्या !; पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जगप्रसिद्ध लोणार सरोवर बघण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात. या परिसरात जास्तीत जास्त पर्यटक आकर्षित झाले पाहिजे. यासाठी विकास कामांना गती देण्याचे निर्देश राज्याचे पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

मंत्रालयातील त्यांच्या दालनात आज लोणार सरोवराच्या जतन, संवर्धन, आणि विकास आराखड्यासंदर्भात घेतलेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिलेत. यावेळी माजी आमदार संजय रायमुलकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, पर्यटन संचालक डॉ.बी. एन. पाटील, एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी, तसेच दूरदृष्यप्रणाली वरून बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, सहाय्यक वनसंरक्षक चेतन राठोड, अर्कीयॉलॉजी विभागाचे अरुण मलिक तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर बघण्यासाठी सामान्य पर्यटकांसह संशोधन करणारे पर्यटकही जगभरातून मोठ्या प्रमाणावर येतात. संशोधनासाठी नासाचे शास्त्रज्ञ ही बराच वेळा येथे येत असतात. त्यामुळे योग्य सुविधा त्या ठिकाणी देण्यासाठी सुरू असलेल्या विकास कामांना गती देण्याचे निर्देश मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी दिले. पर्यटन विभागाकडून दिला जाणारा विकास निधी कमी पडू दिला जाणार नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पर्यटक लोणार सरोवराकडे आकर्षित व्हावे यासाठी त्या ठिकाणी तारांगण, संग्रहालय, चिल्ड्रन पार्क, गार्डन एमटीडीसीचे रेस्ट हाऊसचे काम युद्ध पातळीवर सुरू करण्याच्या सूचना मंत्री श्री.देसाई यांनी यावेळी दिल्या. तसेच या ठिकाणी पर्यटकांना सोयीचे व्हावे म्हणून रोपवेची सुविधा करता येईल का या संदर्भात संबंधित विभागांशी चर्चा करून काम सुरू करण्यासंदर्भात त्यांनी सूचना दिल्या. तसेच इतर काही अडचणी असतील तर त्या स्थानिक पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेऊन सोडवण्याचे निर्देशही श्री.देसाई यांनी यावेळी दिले. यावेळी त्यांनी अमरावती

**मंत्रालयात अधिकाऱ्यांची घेतली बैठक**



विभागाच्या विभागीय आयुक्त श्वेता सिंगल यांच्याशी फोनवरून चर्चा करून विकासकामांना गती देण्याच्या सूचना केल्या.

## डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा!

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरा करण्याचे त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोज डे पासून सुरू झालेला हा डेज चा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, प्रॉमिस डे, टेडी डे, चॉकलेट डे, हग डे, किस डे असे विविध प्रकारचे डे येतात. डेज चा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण येत असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेज च्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील हास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त असावा असे काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते कोणावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांना भेटवस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्र्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डे ची गरज नसते. बरे हे डे पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात तर डेज चे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, सिस्टर्स डे, ब्रदर्स डे, डॉटर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेज ची झाली आहे. सोशल मीडियावर क्टीव असणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडतो. वर्षभर कधी आई वडीलांप्रती आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप क्टीव असतात. जन्मदात्या आई वडिलांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डे ची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेज ची गरज आहे का ? असा प्रश्र्न प्रत्येकाने विचारून पहावा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्र्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाची थेट कर्ज योजना

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्यावतीने थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहे. योजनेचे कर्ज प्रस्ताव जिल्ह्यातील मातंग समाजातील १२ पोटजातीतील अर्जदाराकडून दि. १२ मार्च २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक पात्र उमेदवारांनी अर्ज करावा, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालयाला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता थेट कर्ज योजनेचे ४० उद्दिष्ट आहे. थेट कर्ज योजनेंतर्गत १ लाखामध्ये महामंडळाचे अनुदान रक्कम १० हजार रूपये आणि ५ टक्के लाभार्थी सहभाग हा ५ हजार रुपये आहे. उर्वरीत ८५ हजार महामंडळाचे कर्ज राहणार आहे. थेट कर्ज योजनेचे कर्ज प्रस्ताव जिल्ह्यातील मातंग समाजातील १२ पोटजातीतील इच्छुक अर्जदाराकडून मागविण्यात येत आहेत. कर्जाचे अर्ज दि. १२ मार्च २०२५ पर्यंत दिले जातील. यातील पूर्ण असलेले अर्ज स्विकारले जातील.

कर्ज प्रकरणासाठी इच्छुक अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे. वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. अर्जदाराचे यापूर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. नियमाप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करुन कर्ज प्रस्ताव दोन प्रतीत जिल्हा कार्यालयात स्वत: अर्जदाराने मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहुन दाखल करावेत. त्रयस्त किंवा मध्यस्थांमार्फत कर्ज प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत. कर्ज प्रकरणासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, दोन फोटो, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, घर टॅक्स पावती, कोटेशन, व्यवसायाबाबत जागेचा पुरावा, प्रकल्प अहवाल, ग्रामपंचायत, नगरपालिका यांचे नाहरकत प्रमाणपत्र किंवा शॉप क्ट परवाना, व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र, शैक्षणिक दाखला, अनुदान किंवा कर्जाचा लाभ न घेतल्याचे स्वयंघोषणापत्र, अर्जदाराचा सिबील क्रेडिट स्कोअर किमान ५०० असावा, अर्जदाराचे आधारकार्ड बँकेच्या खात्याशी जोडल्याचे तपशील जोडावा.



थेट कर्ज योजनेंतर्गत प्राप्त अर्जाची लाभार्थी निवड समितीची मान्यता घेवून पात्र अर्जदाराची उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चिठ्ठ्याद्वारे निवड करण्यात येईल. निवड झालेल्या अर्जदाराची वैधानिक दस्तऐवज याची पुर्तता झाल्यानंतर कर्जाचे वितरण करण्यात येईल. योजनेचे कर्ज प्रस्ताव महामंडळाच्या विहित नमुन्यातील अर्ज दि. १२ मार्च २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलडाणा येथे कार्यालयीन वेळेत कर्ज प्रस्ताव सादर करावे.

## आयुष्मान भारत योजना कार्ड वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करावे – सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आयुष्यमान भारत योजनेंतर्गत लाभार्थ्यांना मोफत आरोग्य सेवा मिळण्यासाठी आयुष्मान कार्ड वाटप करण्यात येते. जास्तीत जास्त नागरिकांना आरोग्य सुविधेचा लाभ होण्यासाठी आयुष्मान भारत योजनेच्या कार्ड वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिले.



प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना यांचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर बोलत होत्या. यावेळी राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विनोद बोंदरे, वित्तीय सल्लागार प्रमोद पेटकर, महाव्यवस्थापक (प्रशासन) सुनील सोवितकर, महा व्यवस्थापक (ऑपरेशन) रामेश्र्वर कुंभार उपस्थित होते.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, मोफत आरोग्य सुविधेपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी आयुष्मान भारत योजना कार्ड वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यावे. यासाठी प्रभावी जनजागृती, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, आणि ग्रामसेवक यांच्या मदतीने घरगुती सर्वेक्षण व लाभार्थी सर्वेक्षण प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, अशा सूचना राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी दिल्या.

प्रधाननमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ जास्तीत जास्त रुग्णांना होण्यासाठी व तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अंगीकृत रुग्णालयांची संख्या वाढवण्यात यावी, असेही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी सांगितले.

राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी आरोग्य सुविधा, मनुष्यबळ आदीबाबींचा आढावा घेतला.

'माऊली'च्या दर्शनाला जाताना काळाचा घाला; मिनी बसला कंटेनरची धडक, तिघांचा मृत्यू, तर १५ जखमी

सोलापूर १० फेब्रुवारी (पीएसआय)

पुणे-सोलापूर महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. दुचाकीस्वाराला वाचवण्यासाठी कंटेनर चालकाचा ताबा सुटला आणि कंटेनर थेट मिनी बसला धडकली. या अपघातात दुचाकीस्वार, बसचालकासह तिघे ठार झाले आहेत. तर बसमधील १५ जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना रविवारी (९ फेब्रुवारी) दुपारी २ वाजेच्या सुमारास कोळेगाव पाटीजवळ घडली. मिनी बसमधील सर्व प्रवासी हे अक्कलकोट येथील स्वामी समर्थांचं दर्शन घेऊन पंढरपूरकडं विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघाले होते.

तीन ठार, पंधरा जखमी : या अपघातात दुचाकीस्वार दयानंद भोसले (वय ३५, रा. चंदनगर, लांबोटी ता. मोहोळ), मिनी बसचालक लक्ष्मण बासू पवार (वय ४०) आणि ३५ ते

## भयमुक्त, कॉपीमुक्त परीक्षा संकल्पनेला बळ देण्याकरिता पुढाकार घेण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील दहावी-बारावी परीक्षेच्या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतानाच परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त वातावरणात व्हाव्यात या संकल्पनेला बळ देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.



विद्यार्थ्यांना आवाहन करताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी म्हटले आहे की, उज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांच्या काळात तुम्ही निर्धास्त, आत्मविश्र्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जावे. यासाठी जिल्हा प्रशासन आपल्यासोबत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पाडण्याची संकल्पना आहे.

शिक्षण हे केवळ गुणांसाठी नसून ते तुमच्या ज्ञानवृध्दी आणि जीवन घडविण्याचे साधन आहे. समाजाच्या उज्वल भविष्यासाठी स्वतःच्या मेहनतीवर विश्र्वास ठेवा. प्रामाणिक प्रयत्नांमधून यश संपादन करा, असे आवाहन करतानाच विद्यार्थ्यांना सकारात्मक वातावरण मिळावे तसेच त्यांच्यात आत्मविश्र्वास वाढेल यासाठी पालक व शिक्षकांनी मार्गदर्शन करुन त्यांची मानसिक तयारी करून घ्यावी, असेही उपमुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

कॉपीमुक्त परीक्षा प्रक्रियेसाठी जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रे भयमुक्त व कॉपीमुक्त राहतील यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. राज्यामध्ये कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी व कॉपीमुक्त आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रीयेसाठी जिल्हा प्रशासनाद्वारे विविध उपाययोजना करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना पाठवलेल्या संदेशात म्हटले आहे.

## न्यायमूर्ती गवईंचे हेलिकॉप्टर भरकटले, सुखरूप लँडिंग

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष तथा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी धारणी येथे विधी सेवा महाशिबिराला उपस्थित राहण्यासाठी नागपूर येथून हेलिकॉप्टरने रविवारी उड्डाण केले. मेळघाटात प्रवेश करताच नेटवर्क कनेक्टिव्हिटी खंडित झाल्याने पायलटसह धारणीतील आयोजकांची पाच ते सात मिनिटे भंबेरी उडाली. हेलिकॉप्टर लँड झाल्यानंतर सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. रविवारी सकाळी ११ च्या सुमारास नागपूरहून निघालेल्या हेलिकॉप्टरमध्ये न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्या. अतुल चांदूरकर, न्या. रेवती डेरे, न्या. वासुदेव सांबरे यामध्ये होते.मेळघाट जंगल परिसरात आल्यानंतर अचानक हेलिकॉप्टरची नेटवर्क कनेक्टिव्हिटी गेली. त्यामुळे पाच ते सात मिनिटे हेलिकॉप्टर भरकटले आणि सर्वांना घाम फुटला. काही काळ हवेत घिरट्या घातल्यानंतर चॉपरला नियोजित मार्ग मिळाल्यानंतर ते धारणी मार्गावर आले आणि सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला,अशी माहिती स्वत: न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी त्यांच्यापूर्वीच कारने धारणी गाठले होते.

## विकी कौशलच्या अंगात भिनला मराठी बाणा! पथकासोबत केलं ढोल वादन

**मुंबई/प्रतिनिधी :** लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित आणि विकी कौशल अभिनित 'छावा' या चित्रपटाने प्रदर्शनापूर्वीच धुमाकूळ घातला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित हा सिनेमा येत्या १४ फेब्रुवारीला सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. विकी कौशलला संभाजी महाराजांच्या भूमिकेत मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षक आतुर झाले आहेत. दरम्यान, संपूर्ण टीम चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे.

चित्रपटात विकी कौशल संभाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहेत, तर अभिनेत्री रश्मिका मंदाना येसूबाईंच्या भूमिकेत झळकणार आहेत. त्यांच्या बरोबरच अनेक दिग्गज कलाकार या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसणार आहेत. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आणि अभिनेता विकी कौशल अनेक ठिकाणी मुलाखत देताना आणि चाहत्यांमध्ये सहभागी होताना दिसत आहेत. दरम्यान, एका इव्हेंटमध्ये विकी ढोलताशा पथकासह ढोल वादन करताना दिसला.

'छावा' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी आलेल्या विकीचं दादर येथे जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी ढोलताशा पथकाला बोलवण्यात आले होते. ढोलताशाच्या गजरात विकीने ग्रँड एन्ट्री घेतली. इतकंच नाही, तर त्याने ढोल वादनही केलं. यावेळी विकीचा उत्साह पाहण्यासारखा होता. विकीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी संपूर्ण जगभरातील चित्रपटगृहांमध्ये हा ऐतिहासिक चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची डव्हान्स बुकिंग सुरू झाली आहे, आणि चाहत्यांमध्ये याबाबत जबरदस्त उत्सुकता पाहायला मिळत आहे. दरम्यान, सिनेमाच्या तिकिटांच्या किमतींबाबत बोलायचं झालं तर, अनेक ठिकाणी पहिल्या मॉर्निंग शोचं तिकिट ३०० ते ३५० च्या घरात आहे.

# संकटात सापडलेल्या मुलांसाठी लाईफलाईन : १०९८

देशात लाखो मुलांना दररोज विविध प्रकारच्या शोषण, अत्याचार आणि दुर्लक्षाचा सामना करावा लागतो. या गंभीर समस्येचे निराकरण करण्यासाठी, भारत सरकारने १०९८ चाइल्ड हेल्पलाइन सुरू केली, ही २४/७ चालणारी आपत्कालीन सेवा असून, संकटात असलेल्या मुलांना त्वरित मदत पुरवते.

शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या संदर्भात अडचणी, समस्या आल्यास काळजी आणि सुरक्षेच्या दृष्टीने १०९८ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क करून मदत घेता येते. १०९८ हा टोल फ्री क्रमांक असून, २४७ तात्काळ सेवा देणारी शासकीय यंत्रणा आहे.

एखादे बालक हरवले असेल किंवा विनापालक आढळून आले असेल, व्यसनाधीन झाले असेल किंवा त्याला वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असेल, भिक्षा मागत असेल, शिक्षणापासून वंचित राहत असेल, अशा संकटात, अडचणीत सापडलेल्या मुलांना १०९८ हा आशेचा किरण म्हणून या क्रमांकाकडे पाहिले जाते. एखाद्या बालकाचे लैंगिक, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण होत असेल तर बालक एक पालक, अनाथ, समर्पित किंवा दत्तक घ्यायचे असल्यास किंवा बालकाच्या अधिकारांचे हनन होत असेल तर अशा संकटात असणाऱ्या मुलांच्या मानसिकतेचा विचार करून १०९८ ही सेवा त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. एखाद्या मुलीचा १८ वर्षाच्या आत आणि मुलाचा २१ वर्षाच्या आत विवाह होत असेल, कुठेही कुमारी माता व बालक आढळल्यास तसेच नवजात अर्भक सापडले असल्यास किंवा एखाद्या बालकाला समुपदेशनाची गरज पडल्यास त्यांनी १०९८ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**१०९८ चाइल्ड हेल्पलाइन माहिती आहे ?**

१०९८ चाइल्ड हेल्पलाइन हा एक टोल-फ्री फोन नंबर आहे. हा क्रमांक संकटात असलेल्या मुलांच्या मदतीसाठी भारतातील कोणत्याही फोनवरून डायल केला जाऊ शकतो. या हेल्पलाइन क्रमांकावर तात्काळ मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्ते उपलब्ध असतात. त्यांच्याद्वारे गरजू मुलांना भावनिक आधार, तात्काळ मार्गदर्शन आणि हस्तक्षेप सेवा उपलब्ध करून दिली जाते.

**१०९८ चाइल्ड हेल्पलाइनद्वारे खालील सेवा प्रदान केलेल्या जातात.**

**१. समुपदेशन :** प्रशिक्षित समुपदेशक शोषण, दुर्लक्ष किंवा शोषण यासारख्या समस्यांना तोंड देत असलेल्या मुलांना भावनिक आधार आणि मार्गदर्शन केले जाते.

**२. हस्तक्षेप :** मुलांना हानी पोहोचण्याचा किंवा शोषणाचा धोका असतो आणि त्यांची सुरक्षितता सुनिश्र्चित करण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांसोबत हेल्पलाइन टीम हस्तक्षेप करण्याचे काम करून त्यांना संकटातून बाहेर काढण्याचे काम करते.

**३. रेफरल :** ही हेल्पलाइन स्थानिक संस्था आणि सेवांचा संदर्भ देत गरजू मुलांच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहून समर्थन करत मदत करतात.

**४. माहिती :** हेल्पलाइन बाल हक्क, कायदे आणि धोरणे तसेच मुलांना आधार देण्यासाठी उपलब्ध संसाधने आणि सेवांची माहिती या हेल्पलाईन क्रमांकाव्दारे प्रदान केली जाते.

**१०९८ चाइल्ड हेल्पलाइनवर असा संपर्क साधा**

या हेल्पलाईनची मदत घ्यायची असल्यास देशातील कोणत्याही फोनवरून १०९८ हा नंबर डायल करावा. १०९८ या चाइल्ड हेल्पलाइनवर संपर्क साधण्यासाठी देशातील कोणत्याही भागातून कोणत्याही क्रमांकावरून भारतात कुठेही संपर्क साधता येतो. ही हेल्पलाइन २४/७ उपलब्ध असून, तिचे कॉल हे विनामूल्य आहेत. त्याला कोणताही खर्च येत नाही.

**१०९८ चाइल्ड हेल्पलाइनचा परिणाम**

१०९८ ही सेवा सुरू झाल्यापासून आतापर्यंत या हेल्पलाइनने भारतातील संकटात अडचणीत सापडलेल्या लाखो मुलांच्या जीवनात मोठी मदत झाली आहे.

**१० दशलक्षाहून अधिक कॉल्स :** हेल्पलाइन लॉंच झाल्यापासून १० दशलक्षाहून अधिक कॉल्स प्राप्त झाले आहेत, दरमहा सरासरी ५० हजाराहून अधिक कॉल्स प्राप्त झाले असून, त्या मुलांना मदत करण्यात आली आहे.

**५ दशलक्षाहून अधिक मुलांना सहाय्य प्रदान केले :** १०९८ या टोलफ्री हेल्पलाइनने ५ दशलक्षाहून अधिक अडचणीत असलेल्या मुलांना मदत केली आहे. या क्रमांकावर अत्याचार, दुर्लक्ष किंवा शोषण झाले आहे, अशा मुलांना वेळेत मदत झाली आहे.

**१ लाखांहून अधिक मुलांची सुटका :** १०९८ या हेल्पलाइन क्रमांकाने १ लाखांहून अधिक मुलांची शोषण आणि हानीच्या परिस्थितीतून सुटका केली आहे.

१०९८ चाइल्ड हेल्पलाइन ही एक महत्त्वाची सेवा असून, संपूर्ण देशभरात संकटात असलेल्या मुलांसाठी ती जीवनरेखा ठरली आहे. १०९८ क्रमांक डायल करून संकटात सापडलेल्या मुलांना प्रशिक्षित समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून त्वरित मदत, सहकार्य आणि मार्गदर्शन मिळू शकते. एक समाज म्हणून, मुलांचे संरक्षण आणि समर्थन मिळाल्याची खात्री करणे ही या टीमची जबाबदारी आहे आणि १०९८ चाइल्ड हेल्पलाइन या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**प्रभाकर बारहाते**
जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# लोकाभिमुख प्रशासन निर्माण करणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी : अभिजीत राऊत

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा स्वागत तर अभिजीत राऊत यांचा निरोप समारंभ साजरा





दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** शासकीय सेवेमध्ये आपण येतो ती लोकांची सेवा करण्यासाठी. लोकांच्या मनात आपल्याबद्दल विश्र्वास निर्माण झाला पाहिजे. हा विश्र्वास कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा असतो. खरे तर लोकाभिमुख प्रशासन निर्माण करणे ही प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी असते, असे प्रतिपादन वस्तू व सेवा कर सह आयुक्त अभिजीत राऊत यांनी आज येथे केले.

नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भावनमध्ये आज नवनियुक्त जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा स्वागत समारंभ व मावळते जिल्हाधिकारी तथा संभाजीनगर येथील वस्तू व सेवा कर सह आयुक्त अभिजीत राऊत यांचा निरोप समारंभ महसूल व अन्य कर्मचाऱ्यांमार्फत आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांनी लोकाभिमुख प्रशासन ही आपल्या प्रशासकीय सेवेची ओळख बनवा, असे आवाहन यावेळी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना केले.

नांदेड जिल्ह्यातील आपले वास्तव्य आठवणीत राहणारे असून या काळात जलसंधारणापासून लेंडी प्रकल्पाला गती दिल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. दोन लोकसभा निवडणुका एक विधानसभा निवडणूक, तसेच मराठवाड्यात आणि जिल्ह्यामध्ये सामाजिक आंदोलन सुरू असताना जिल्ह्यात शांतता ठेवता आली. कारण एक टीम म्हणून प्रत्येक जण काम करत होते. नव्या जिल्हाधिकाऱ्यांसोबत देखील हीच टीम काम करणार असून नांदेडमध्ये आणखीन चांगले काम होईल,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आपण कायम शांततेत राहून काम करत असतो, असे अनेक जण म्हणतात. खरं म्हणजे शांत न राहता काम केल्यास अर्थात डोके गरम ठेऊन काम केल्यास चुका होतात. त्यामुळे जर तुम्हाला चुका करायच्या नसतील तर कोणी कितीही डिवचले तरी त्याला बळी न पडता काम करा. खरं म्हणजे प्रशासकीय पदांवर प्रमुख असणाऱ्या माणसाने शांततेनेच काम केले पाहिजे. कारण तुम्ही जर अस्वस्थ झालात तर अन्य कामावर त्यांचा परिणाम होतो.

नांदेड मध्ये गेल्या अडीच वर्षात अनेक चांगली कामे झाले. शासन आपल्या दारी, महासंस्कृती महोत्सव, लाडकी बहीण मेळावा अशी मोठ मोठे कार्यक्रम अतिशय उत्तमरीत्या टीमवर्कने पार पडले. नांदेडच्या या टीमचे वैशिष्ट्य म्हणजे तयारी नसेल तरीही टीम भारी काम करून दाखवू शकते. नव्या जिल्हाधिकाऱ्यांसोबत सुद्धा अशाच पद्धतीने कामे सुरू राहावी अशा शुभेच्छा ही त्यांनी व्यक्त केल्या.

नवनियुक्त जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी अभिजीत राऊत सारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा कित्ता गिरवायला मिळणार याचा आनंद आहे .त्यांच्याकडून आपण नेहमीच मार्गदर्शन घेत होतो. प्रशासकीय स्तरावर ते कायम मार्गदर्शक राहिले आहे. आता त्यांचेच उत्तराधिकारी म्हणून काम करताना त्यांच्यासारखे काम करणे ही जबाबदारी आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही जबाबदारी पार पाडली जाईल, असे आश्र्वासन त्यांनी यावेळी दिले.

या निरोप समारंभाला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचे आई-वडील व त्यांच्या पत्नी, त्यांचे आई-वडील उपस्थित होते. याशिवाय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, सहाय्यक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा, सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपजिल्हाधिकारी निवडणूक राजकुमार माने, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसीलदार सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी महसूल कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांचे प्रमुख अनेक ज्येष्ठ नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सूत्रसंचालन मुगाजी काकडे यांनी केले. निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी संबोधित केले. तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी ही मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन तहसीलदार नागमवाड यांनी केले.

## संक्षिप्त...

### कुंभमेळ्यासाठी जाणाऱ्या प्रवाश्यांसाठी मध्य रेल्वेकडून विशेष सुविधा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कुंभ मेळ्यासाठी जाणाऱ्या नागरिकांसाठी मध्य रेल्वेद्वारे १६ ते १७ रेग्युलर ट्रेन्स् चार ते पाच स्पेशल ट्रेन या प्रति दिवशी चालवल्या जात आहेत.अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्निल नीला यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. एवढी अधिक माहिती देताना डॉक्टर नीला म्हणाले की, ट्रेनद्वारे लाखो भाविक कुंभमेळामध्ये संगमामध्ये स्थान करण्याचे पुण्य प्राप्त करत आहेत.प्रयागराज स्थानकाजवळ आठ स्थानकामध्ये प्रवाश्यांसाठी सोयी सुविधा करण्यात आल्या आहेत. प्रवाश्यांनी कोणत्याही प्रवासा दरम्यान अफवांवर विश्र्वास ठेवू नये, योग्य ती माहित जाणून घेण्यासाठी मध्य रेल्वे, भारतीय रेल्वे च्या सोशय मिडीया साईटचा वापर करावा, प्रवाशांचा प्रवास सुखकार व्हावा, यासाठी मध्य रेल्वेद्वारे आणि सर्व भारतीय रेल्वे द्वारे प्रयत्न केले जात आहेत. ९ फेब्रुवारी दिवशी प्रयागराज स्थानकावरुन ३३० गाड्या चालवल्या गेल्या आहेत.हा एक प्रकारचा विक्रम आहे.प्रवाश्यांसाठी अजून गाड्या चालवण्यासाठी प्रशासन पुर्णत: सज्ज आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, भुसावळ , नागपुर, पुणे अशा मुख्य स्थानकांवर तिकिटाची सोय करण्यात आली आहे.अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्निल नीला यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

### भाऊ वडिलोपार्जित संपत्तीत काही एक हिस्सा देत नसल्याने सख्या भावानेच केला भावावर प्राणघातक हल्ला



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** दिवसा ढवळ्या कल्याणमधील लक्ष्मी मार्केटमध्ये वारकू माढवी या शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ला झाला. हल्ला करणारा डोक्यावर टोपी आणि तोंडावर मास्क घालून होता. हातात कोयत्याने तो बारकू मढवी याच्यावर एकामागे एक वार करीत होता. बारकू मेला असल्याचे समजून आरोपी पळून गेला. मात्र बारकू हे वाचले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे. या प्रकरणामध्ये कल्याणच्या महात्मा फुले पोलिसानी धक्कादायक खुलासा केला आहे. बारकू मढवी यांच्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करणारा दुसरा तिसरा कोणी नसून त्यांचा सख्खा भाऊ कृष्णा मढवी आहे. वडिलोपार्जित संपतीत बारकू हा कृष्णाला हिस्सा देत नसल्याच्या रागातून कृष्णा याने हा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे.

### वाहतूक पोलिसांकडून बीड शहरातील २०० ऑटो रिक्षा जप्त

**बीड/प्रतिनिधी :** बीड वाहतूक पोलिसांनी रात्री उशिरा मोहीम राबवून दोनशे ऑटोरिक्षा जप्त केल्या आहेत. त्याबरोबरच कर्कश्श्य आवाज करणाऱ्या बुलेट सायलेन्सर वर देखील कारवाई केली आहे. बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सुभाष रोड, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात ऑटो रिक्षा उभे असतात. वाहतूक पोलिसांनी अचानक सर्च मोहीम राबवत ऑटो रिक्षाची कागदपत्र ड्रायव्हिंग लायसन्स फॅन्सी नंबर विमा नसणे अशा ऑटो रिक्षावर कारवाई करत जप्त केले आहेत. यामध्ये दोनशे रिक्षांचा समावेश आहे. ऑटो रिक्षा बरोबरच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बुलेटवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

### माजी सैनिक आरक्षणाच्या जागांवर नियमबाह्य पद्धतीने भरती सुरू असल्याने माजी सैनिकांकडून आंदोलन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरात जिल्हा परिषदेच्या सैनिक कल्याण विभागाकडून माजी सैनिक आरक्षणाच्या जागांवर नियमबाह्य रीतीने भरती सुरू आहे. याचा गेल्या दोन महिन्यांपासून माजी सैनिकांकडून निषेध केला जात आहे. याच संदर्भात जिल्ह्यातील सैनिकांनी आता रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले आहे. सैनिक कल्याण विभागाकडून या भरतीमध्ये चुकीच्या पद्धतीचा अवलंब सुरू असून तो थांबवावा, असे पत्र देऊनही प्रशासन दखल घेत नाही. त्यामुळेच सीमेवर लढताना गाजवलेल्या शौर्याचे प्रतीक म्हणून मिळालेले मेडल्स जिल्हाधिकाऱ्यांना परत केले आहेत. यावेळी जोरदार घोषणाबाजीमुळे परिसर दणाणून सोडण्यात आला.



## ‘दिलखुलास’ कार्यक्रमात परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांची मुलाखत



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ’दिलखुलास’ कार्यक्रमात ’परिवहन विभागामार्फत राबविण्यात येत असलेले ’रस्ता सुरक्षा अभियान’ व विविध उपक्रम’ याविषयावर परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे.

‘दिलखुलास’ कार्यक्रमात ही मुलाखत बुधवार दि. १२, गुरुवार दि. १३, शुक्रवार दि.१४, आणि शनिवार दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. निवेदिका रितली तपासे यांनी ही मुलाखत घेतली आहे.

रस्ता सुरक्षा ही आपल्या दैनंदिन जीवनातील अतिशय महत्त्वाची बाब आहे. नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती व रस्ते अपघातांचे टाळण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. याकरिता परिवहन विभागामार्फत दरवर्षी जानेवारी महिन्यात ’रस्ता सुरक्षा अभियान’ राबविण्यात येते. या अभियानाच्या माध्यमातून स्पीड गन, हेल्मेटचा वापर करणे, विभागामार्फत लागू करण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करणे इत्यादी बाबींवर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. तसेच नुकताच सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी अर्थात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लावणे, जुन्या गाड्या वापराबाबत करावयाच्या नियमांचे पालन आदी निर्णय आणि शंभर दिवसाच्या कामकाजात प्रामुख्याने करावयाच्या बाबी, याविषयी परिवहन आयुक्त भीमनवार यांनी ’दिलखुलास’ कार्यक्रमात माहिती दिली आहे.

## भुयारी मार्ग सुरू करण्यासाठी नागरिकांचे बोंब मारो आंदोलन

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर शिवाजीनगर रेल्वे गेट क्रमांक ५५ येथील रेल्वे भुयारी मार्गाचे लवकर उद्घाटन करून तो जनसामान्यांसाठी खुला करण्यात यावा यासाठी आज देवळाई सातारा जनसेवा युवा कृती समितीच्या वतीने बोंब मारो आंदोलन करण्यात आले. शिवाजीनगर रेल्वे गेट क्रमांक ५५ येथील रेल्वे भुयारी मार्गाची लवकर उद्घाटन करून तो जनसामान्यांसाठी खुला करण्यास प्रशासनाकडून सतत तारखेवर तारीख देऊन टाळाटाळ होत आहे. त्यामुळे देवळाली सातारा परिसर व ४२ खेडे व शहरातील सर्वसामान्य नागरिक हे मेटाकुटीला आले आहे. याबाबत आम्ही प्रशासनाला विनवण्या केल्या, या त्रासातून जनतेला मुक्तता हवी याकरिता प्रशासनास विनंती केली. परंतु, शासनाकडून उदासीन धोरण अवलंबले गेले आहे. त्यामुळे निद्रीच प्रशासनाला जागी करण्यासाठी देवळाली सातारा जनसेवा युवा प्रति समितीच्या वतीने संपूर्ण बायपास परिसरातील नागरिकांच्या वतीने आज सायंकाळी या रस्त्याला छत्रपती शिवाजी महाराज भुयारी मार्ग असे नाव देऊन उद्घाटन झाले असे कृती समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

## आई - वडिलांना वृद्धापकाळात त्रास होऊ नये यासाठी ग्रामपंचायतीने घेतला धाडसी निर्णय




दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर /प्रतिनिधी :** आई - वडिलांना सांभाळा नीहीतर ग्रामपंचायत कोणताही दाखला देणार नाही, वारसा नोंद ही करणार नाही
उत्तर सोलापूर तालुक्यातील तळे हिप्परगा ग्रामपंचायतीने ठराव करून घेतला निर्णय
गावातील जेष्ठ नागरिक (आई वडील) यांना मुलांनी संभाळलं नाही तर युवकांना बसणार फटका पाच ते साडे पाच हजार लोकसंख्या असणाऱ्या तळे हिप्परगा या गावात एक ते दीड हजार आहेत जेष्ठ नागरिक आहेत आई - वडिलांना वृद्धापकाळात त्रास होऊ नये यासाठी ग्रामपंचायतीने घेतला धाडसी निर्णय त्यासोबतच गावाचे विद्रुपीकरण टाळण्यासाठी गावात होर्डिंग्स आणि डिजिटल बॅनर्स नलावण्याचा ही ठराव मंजूर करण्यात आला
तळे हिप्परगा ग्रामपंचायतीने आई - वडिलांसाठी घेतलेल्या या महत्वपूर्ण निर्णयाची सध्या सर्वत्र होत आहे चर्चा.

## तब्बल दोन लाख साठ हजाराला विकली म्हैस

दैनिक आपला विदर्भ




**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर खंडेराव महाराज यात्रेनिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती येथे गुराचा मोठा बाजार भरत असतो या पंधरा दिवसाच्या यात्रेनिमित्त लाखो रुपयांची उलाढाल होते. आज कृषी उत्पन्न बाजार समिती येथे गिर जाफर जातीची म्हैस व्यापारी अरुण बडगुजर यांनी जुनागड येथून आणली होती त्यांनी शेतकरी मनोहर पारधी यांना तब्बल २ लाख साठ हजार ला विकले आहे ही गिर जाफर जातीची म्हैस पाहण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती गिर जाफर जातीची म्हैस घेणाऱ्या शेतकऱ्याकडे पहिले ७० म्हैशी आहेत परंतु त्यांना गिर जाफर जातीची म्हैसची आवड असल्याने त्यांनी आज व्यापाराकडून ही म्हैस विकत घेतली देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीसोबतच पशुपालनाचाही खूप महत्त्वाचा वाटा आहे. गावागावात मोठ्या प्रमाणात शेतकरी गाय, म्हशी, शेळीपालनातून भरीव उत्पन्न मिळवत आहेत. गुजरातमध्ये आढळणारी जाफ्राबादी जातीच्या म्हशी त्यांची ताकद आणि दूध देण्याची क्षमता जास्त असल्यामुळे ही म्हैस शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे.

जाफ्राबादी म्हशीपासून चांगल्या प्रमाणात दूध मिळते. या म्हशीच्या दुधात ८% फॅट असते, ज्यामुळे शरीर मजबूत होते. या म्हशी गुजरातच्या गीर जंगलात आढळून येतात. जाफ्राबादी म्हैस दररोज तब्बल २० ते २५ लिटर दूध देते. हिशोब केला तर लक्षात येईल की या म्हशीची एका महिन्यात शेकडो लिटरहून अधिक दूध देण्याची क्षमता आहे.जाफ्राबादी म्हैस अतिशय शक्तिशाली मानली जाते. गीर जंगलातील या म्हशीबद्दल असे म्हटले जाते की तिच्यात इतकी ताकद आहे की ती एका सिंहाशी देखील लढू शकते. आज व्यापाऱ्याने दोन लाख ६० हजार रुपयात सदर शेतकऱ्याला म्हैस विक्री केली आहे.

## विविध वृत्त...

### राज्यमंत्री पंकज भोयर यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे गृह(ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री पंकज भोयर हे मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार मंगळवार दि. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता शेगांव जि. बुलढाणा येथे आगमन व दुपारी १२ वाजता संत गजानन महाराज देवस्थान येथे दर्शन. दुपारी १२.३० ते १.३० वाजेपर्यंत राखीव. दुपारी २ वाजता विघ्नहर्ता ईन हॉटेल, खामगांव रोड शेगांव येथे विदर्भातील नागरी सहकारी बँकांच्या संचालकांकरीता ठरविण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये उत्कृष्ट बँक स्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ४ ते ९ वाजेपर्यंत राखीव. रात्री ९.१५ वाजता शेगांव येथून मुंबईकडे प्रयाण करतील.

### २५ ते ३० वर्ष वयोगटातील अनोळखी महिलेचा आढळला अर्धवट जळालेला मृतदेह



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्याच्या गोरेगाव तालुक्यातील देऊटोला-बबई शेत-शिवारामध्ये एका २५ ते ३० वर्षे वयोगटातील अनोळखी महिलेचा मृतदेह अर्धवट जळलेल्या अवस्थेमध्ये आज सकाळी आढळून आला. बबई येथील शेतकरी पहाटे आपल्या शेतात गेले असता महिलेचा मृतदेह जळत असताना त्याला आढळला. शेतकऱ्याने घटनेची माहिती गोरेगाव पोलिसांना दिल्यानंतर गोरेगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखत गोंदियाचे पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी देखील घटनास्थळाची पाहणी केली असून, महिलेची ओळख पटविण्याकरिता पोलीस तपास करत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी दिली आहे.

### प्रतीक्षा माधव सदावर्ते हिने मिळविला राज्य चित्रकला इंटरमिजिएट परीक्षेत विशेष प्राविण्य

यापुर्वीही तिने नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे यांचे हुबेहूब चित्र रेखाटले होते




दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना :** लोणार तालुक्यातील कुमारी प्रतीक्षा माधव सदावर्ते ही महारचिकना येथील जिल्हा परिषद शाळेत शिकत होती परंतु तिचे वडील माधव भीमराव सदावर्ते हे त्यांच्या हॉटेल व्यवसायासाठी देऊळगाव राजा येथे गेले असता मुलीचे शिक्षण सुद्धा देऊळगाव राजा येथील दीनदयाल विद्यालय येथे नववीच्या वर्गात शिकत आहे या शाळेत दहा जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य चित्रकला इंटरमिजिएट परीक्षा घेण्यात आली त्या परीक्षेमध्ये कुमारी प्रतीक्षा हिने मुंबई विद्यापीठात हे ग्रेड मिळून विशेष प्राविण्य मिळवले आहे त्यामुळे शाळेचे दिनदयाल विद्यालयाचे प्राचार्य तसेच सर्व शिक्षक यांचे कडुन प्रमाणपत्र देउन सत्कार करण्यात आला त्यामुळे परिसरात तिचे खूप कौतुक होत आहे

### बीअरबायसेप्स पॉडकास्टर रणवीर अल्लाहबादिया वादाच्या भोवऱ्यात

**मुंबई/प्रतिनिधी :** विनोदवीर प्रणित मोरेला झालेल्या मारहाणीनंतर आता बीअरबायसेप्स युट्यूबर-पॉडकास्टर रणवीर अल्लाहबादिया वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील शिंदे यांचा नातू वीर पहारियावर जोक केला म्हणून प्रणित मोरेला मारहाण झाली होती. सोलापूरमध्ये ही घटना घडली होती. आता युट्यूबर-पॉडकास्टर रणवीर अल्लाहबादिया याने समय रैनाच्या ''इंडियाज गॉट लेटेंट'' शोवर केलेल्या टिप्पणीमुळे वाद निर्माण झाला आहे.

# यंदा लोणार पर्यटन महोत्सव होणार

**पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची माहिती**

दैनिक आपला विदर्भ





**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर जगप्रसिद्ध आहे. त्याचे महत्त्व आणि व्याप्ती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी यावर्षी पासून लोणार पर्यटन महोत्सव सुरू करण्यात येणार असल्याची माहिती पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

मंत्रालयातील त्यांच्या दालनात त्यांनी लोणार सरोवर बाबत बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत माजी आमदार संजय रायमुलकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, पर्यटन विभागाचे संचालक डॉ.बी. एन. पाटील, एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील दूरदृष्यप्रणाली द्वारे उपस्थित होते.

जगात उल्कापातामुळे झालेले तीन सरोवर आहेत. त्यापैकी एक बुलढाणा जिल्ह्यातील लोणारमध्ये आहे. त्याचे महत्त्व सर्वांना कळावे यासाठी राज्याच्या पर्यटन विभागातर्फे यावर्षी पासून पर्यटन महोत्सव घेणार असल्याचे मंत्री श्री.देसाई यांनी यावेळी सांगितले. सर्व लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची लवकरच बैठक घेऊन त्याची तारीख व वेळ घोषित करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## प्रवाश्यांच्या समस्या व निराकरणासाठी दर सोमवार व शुक्रवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ वर्धा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या सोमवार व शुक्रवारला सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिन व दुपारी ३ ते ५ या वेळेत कामगार पालक दिन आयोजित करण्यात येणार आहे. प्रवाशी आणि महामंडळाचे कामगार यांनी याचा लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यारी वैयक्तिक प्रश्न्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील.



बुलडाणा विभागातील आगारामध्ये प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. चिखली आगार येथे शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी, खामगांव आगार येथे सोमवार दि. १७ फेब्रुवारी, मेहकर आगार येथे शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी, मलकापूर आगार येथे सोमवार दि. २४ फेब्रुवारी, जळगांव जामोद येथे शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी व शेगांव आगार येथे सोमवार दि. ३ मार्च रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

## दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना पालकमंत्र्यांनी दिल्या शुभेच्छा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'कॉपीमुक्त आणि भयमुक्त परीक्षा अभियान' राबविण्याचे निश्चित केले आहे. या अभियानाच्या अनुषंगाने, नांदेड जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन सहकार्य करण्याचे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा उद्या दिनांक ११ फेब्रुवारी पासून सुरू होत आहेत यानिमित्त पालकमंत्री अतुल सावे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

पालकमंत्री श्री.सावे म्हणाले, शिक्षण हे केवळ गुणांसाठी नाही, तर ते ज्ञानवृद्धी आणि जीवनमूल्य घडविण्याचे साधन आहे. समाजाच्या उज्वल भविष्यासाठी माझी सर्व विद्यार्थ्यांना विनंती आहे की, त्यांनी स्वतःच्या मेहनतीवर विश्र्वास ठेवून, प्रामाणिक प्रयत्नांद्वारे यश संपादन करावे. आगामी परीक्षा काळात जिल्हा प्रशासन विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे आणि सर्व परीक्षा केंद्रे कॉपीमुक्त आणि भयमुक्त राहतील यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यांनी सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि शालेय व्यवस्थापनांनाही अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### अमरावती विभागात दहावी व बारावीच्या परीक्षेची तयारी पूर्ण, ३ लाखाहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती विभागीय शिक्षण मंडळाच्या वतीने येत्या फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात दहावी व बारावीच्या परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. विभागीय सचिव नीलिमा टाके यांनी परीक्षेच्या तयारीची माहिती देताना सांगितले की, परीक्षेसाठी सर्व आवश्यक व्यवस्था पूर्ण करण्यात आल्या आहेत. बारावीची परीक्षा ही येत्या ११ फेब्रुवारी २०२५ ते १८ मार्च २०२५ या कालावधीत होणार असून, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम या पाच जिल्ह्यांतील १ लाख ५२ हजार ९८२ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. ही परीक्षा ५४२ परीक्षा केंद्रांवर घेतली जाणार आहे. तर दहावीची परीक्षा ही २१ फेब्रुवारी २०२५ ते १७ मार्च २०२५ या कालावधीत होणार असून, या परीक्षेसाठी १ लाख ६४ हजार ४८ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. परीक्षा काळात भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा पार पडावी, यासाठी ९ भरारी पथके नेमण्यात आली आहेत. या पथकांमध्ये विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, प्राचार्य, तसेच शिक्षण विभागातील महिला अधिकाऱ्यांचे स्वतंत्र महिला भरारी पथक कार्यरत असणार आहे. विभागीय सचिव नीलिमा टाके यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे की, परीक्षा काळात कोणत्याही प्रकारच्या गैरसाहित्याचा वापर करू नये व परीक्षेला प्रामाणिकपणे सामोरे जावे. परीक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी प्रशासनाने सर्वतोपरी तयारी केली असून, विद्यार्थ्यांना कोणताही अडथळा येऊ नये यासाठी दक्षता घेतली जात आहे.

## दत्तक विधान प्रक्रिया; इच्छुक पालकांनी कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करावी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित २०२१ दत्तक नियमावली २०२२ नुसार भारतात दत्तक विधान प्रक्रिया राबविली जाते. यानुसार दत्तक विधान कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून भावी इच्छुक माता-पिता बालक दत्तक घेऊ शकतात, असे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**बाळ दत्तक कोण घेऊ शकतो**

भावी दत्तक माता हे शारीरिक, मानसिक, भावनात्मक आणि आर्थिक स्वरुपात सक्षम असणे आवश्यक आहे. या दत्तक विधान प्रक्रियेसाठी दोन्ही पती-पत्नी यांची सहमती असणे आवश्यक आहे. एकल महिला हि दत्तकसाठी बालक किंवा बालिका निवडु शकते, एकल पुरुष फक्त बालकाची निवड करु शकतो.

**बाळ दत्तक घेण्यासाठीची पालकांची वयोमर्यादा**

दोन वर्षाच्या आतील बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची संयुक्तिक कमाल वयोमर्यादा ८५ वर्ष, तर भावी एकल माता पिता यांची कमाल वयोमर्यादा ४० वर्ष, दोन ते चार वर्षापर्यंतचे बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची संयुक्तिक कमाल वयोमर्यादा ९० वर्ष, तर भावी एकल माता व पिता यांची कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष, चार ते आठ वर्षापर्यंतचे बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची कमाल वयोमर्यादा संयुक्तिक १०० वर्ष, तर भावी एकल माता व पिता यांची कमाल वयोमर्यादा ५० वर्ष, आठ ते १८ वर्षापर्यंतचे बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची संयुक्तिक कमाल वयोमर्यादा ११० वर्ष, तर एकल भावी माता व पिता यांची कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष असावी.



**दत्तक विधानासाठी अर्ज कुठे करावा**

दत्तक विधानामार्फत बाळ घेऊ इच्छिणाऱ्या भावी माता पिता यांनी https://cara.wcd.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर आपला अर्ज करावा. तसेच दत्तक विधानाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, सुवर्ण नगर, मुट्ठे ले आऊट, बस स्टँड मागे, डॉ.जोशी हॉस्पिटल यांचे शेजारी, बुलढाणा येथे भेट देऊ शकता व यशोधाम, दिलव्ह ट्रस्ट, खामगाव रोड, सुंदरखेड, बुलढाणा या विशेष दत्तक संस्थेस भेट देऊन माहिती प्राप्त करुण घेऊ शकता.

**दत्तक विधानासाठी अर्ज केल्यानंतरची प्रक्रिया**

दत्तक विधानासाठी अर्ज केल्यानंतर गृह अध्ययन अहवालासाठी अर्जदारांना निकटची दत्तक संस्था निवडावी लागते, सदर अर्ज केल्यानंतर गृह अध्ययन अहवाल करण्यासाठी सदर संस्थेने ६० दिवसाच्याआत अर्जदारांच्या घरी जाऊन अहवाल तयार करणे बंधनकारक आहे. सदर गृह अध्ययन अहवाल हा तीन वर्षासाठी लागू राहील.

दत्तक विधान संस्थेमार्फत गृह अध्ययन अहवाल कारा पोर्टलवर अपलोड केल्यानंतर एक महिन्यानंतर आपल्याला आपल्या पसंतीनुसार बाळ दिसने सुरु होईल. ज्यामध्ये बाळाचा फोटो, मेडीकल रिपोर्ट, बालक अभ्यास अहवाल इत्यादी माहिती असेल. जर एखादे बाळ आपणास पसंद पडल्यास सदर बालकास ४८ तासाच्या आत कारा पोर्टलवरुन आरक्षित करावे लागेल. सदर भावी माता पितांची दत्तक विधान समिती बैठकीत साक्षात्कार व आकलन केल्यानंतर व भावी माता पिता हे बालकासाठी योग्य वाटल्यास बालक पालकांच्या ताब्यात तात्पुरत्या स्वरुपात प्रि फोस्टर केअर अंतर्गत दिले जाते व संस्थेमार्फत बालक व पालकांची नस्ती तयार करुन न्यायालयामार्फत पालकांना दत्तक आदेश दिल्या जातो.

## सैलानी यात्रेत येणाऱ्या भाविकांना चांगली सुविधा द्या! शरद पाटील

**प्रशासनाची सैलानीत नियोजन बैठक संपन्न**

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सैलानी बाबांच्या यात्रेत देशभरातून भाविक मोठ्या आस्थेने येतात. या भाविकांना प्रशासनाकडून चांगली सेवा प्रदान करा तसेच यात्रेकरूंना त्रास होऊ नये यासाठी प्रशासनातील सर्व घटकांनी पुढाकार घेऊन काम करावे अशा सूचना बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी सैलानी येथे आयोजित नियोजन बैठकीत केले आहे.

बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई गावाजवळ हाजी हजरत अब्दुल रहमान उर्फ सैलानी बाबा यांची दर्गा असून दरवर्षी होळी दहनने या ठिकाणी यात्रा उत्सवाची सुरुवात होत असते. देशभरातून सर्व धर्मीय लाखो भाविक सैलानी बाबांच्या दर्गावर हजेरी लावतात. येत्या मार्च महिन्यात ही वार्षिक यात्रा उत्सव होणार असून त्या अनुषंगाने आज १० फेब्रुवारीला दुपारी ४ वाजेच्या सुमारास सैलानी येथे प्रशासनाने नियोजनासाठी प्राथमिक स्तरावर बैठकीचे आयोजन केले होते.

सदर बैठक बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यात बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे, गटविकास अधिकारी अमिता पवार,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सरपाते,पीएसआय सखाराम सोनुने, महावितरणचे अभियंता कायंदे, पिंपळगाव सराई सरपंच रूपाली केशव तरमळे, माजी पंचायत समिती सदस्य शेख चांद मुजावर,पोलीस पाटील रामेश्र्वर पाटील यांच्यासह इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत स्वच्छता, रस्ते,पाणी,विद्युत व्यवस्था,संदल मार्ग दुरुस्ती,पार्किंग,वाहतूक व्यवस्था,आरोग्य या विषयावर चर्चा करून येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

